INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

January - 2017

SPECIAL ISSUE-XI

## प्रसार माध्यमे आणि साहित्य व्यवहार




**Guest Editor**

Dr. Motiram Deshmukh
Principal,
MGV's Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist – Nashik [M.S.] INDIA

Dr. P. K. Shewale
Vice Principal,
MGV's Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Chief Editor**

Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

mpact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2017
SPECIAL ISSUE-XI

# प्रसार माध्यमे आणि साहित्य व्यवहार

**Guest Editor**
Dr. Motiram Deshmukh
Principal,
MGV'S Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Dr. P. K. Shewale
Vice Principal,
MGV'S Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist – Nashik [M.S.] INDIA

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 500/-

ISSN : 2348-7143
January 2017

# अनुक्रमणिका


| अ. नं. | शोध निबंधाचे शीर्षक .......................................... लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | संपादकीय .................................................. डॉ. मोतीराम देशमुख | 04 |
| 2 | बदलती प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार .....डॉ. अतुल चौरे, प्रा. चंद्रशेखर घुगे | 05 |
| 3 | नियतकालिकांची कार्ये ........................................ .. . डॉ. प्रकाश शेवाळे | 08 |
| 4 | मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रसारमाध्यमे ........................ प्रा. संतोष लोंढे | 10 |
| 5 | दलित नियतकालिके आणि दलित साहित्यचळवळ ............... प्रा. नाना झगडे | 14 |
| 6 | नभोनाट्य लेखनतंत्र ............................................... प्रा. रवींद्र पगार | 17 |
| 7 | नभोवाणी बातमीपत्र .............................................. प्रा. सोमनाथ पावडे | 20 |
| 8 | प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार ..................... प्राचार्य डॉ.उज्ज्वला देवरे | 24 |
| 9 | कादंबरी आणि सिनेमा ........................................ .. डॉ. गीतांजली चिने | 29 |
| 10 | कादंबरी व सिनेमा ...................................... प्रा. वर्षा सोमनाथ शेवाळे | 32 |
| 11 | नटरंग एक नेटकं आणि देखणं माध्यमांतर ............... डॉ. वासुदेव सोमाजी वले | 35 |
| 12 | साहित्याची भाषा व सिनेमाची भाषा ......................... प्रा. तुकाराम भवर | 39 |
| 13 | प्रसारमाध्यमातील बदलते सामाजिक पर्यावरण ............. डॉ. बालाजी घारूळे | 43 |
| 14 | प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार ................................ प्रा. लीना शेंडे | 47 |
| 15 | वर्तमान पत्रे : प्रभावी प्रसार माध्यम..................................डॉ. भाऊसाहेब गमे | 51 |
| 16 | वृत्तपत्र व्यवहारात भाषेचे महत्व........................................... युवराज भामरे | 55 |
| 17 | वृत्तपत्रे लोकशाहीचा चौथा स्तंभ .................................. प्रा. छाया शिंदे | 59 |
| 18 | फेसबुक आणि मराठी साहित्य................................... डॉ. विद्या सुर्वे - बोरसे | 63 |
| 19 | कलाकृतीचे माध्यमांतर ............................................. डॉ. राजेंद्र थोरात | 69 |
| 20 | साहित्य, सिनेमा आणि पटकथालेखन ........................... डॉ. पिंगळे किरण | 75 |
| 21 | प्रसार माध्यमातील लेखक : ह. मो. मराठे .......................... डॉ. राजेंद्र देवरे | 79 |
| 22 | जनसंचार माध्यमों में हिंदी ........................................ डॉ. पूनम बोरसे | 83 |
| 23 | Freedom of Press in India ..................... Prof. Vardhaman Ahiwale | 88 |
| 24 | The Principles of Social Media Censorship ....... Dr. Vivek V. Jawale | 93 |
| 25 | Use of Multimedia in English Language Teaching ...Prof. Pranjali B. Vidyasagar | 98 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

❖ **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 11 : प्रसार माध्यमे आणि साहित्य व्यवहार
ISSN : 2348-7143
January 2017

# नियतकालिकांची कार्ये

**प्रा. प्रकाश कारभारी शेवाळे**
**सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग**
**म.गांधी विद्यामंदिर संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय हरसुल**
**मोबा.नं .८९७५५५५८१५**
Email: prof.prakashshewale@gmail.com

१९ व्या शतकात महाराष्ट्रात प्रसारमाध्यमांचे प्रमाण अत्यल्प होते. करमणुकीची साधने अतिशय कमी होती. विद्येची दारे उघडली जाणे व ज्ञानाच्या कक्षा रूंदावून सर्वसामान्यांपर्यंत पोहचणे गरजेचे होते. समाजातील अबालवृद्धांचे मनोरंजन हे त्यांच्या पारंपरिक खेळ-उत्सवातून होत असे. काळ बदलला, वेळेचे महत्त्व वाढले. काळाबरोबर समाजाच्या गरजा वाढल्या. समाजाचे मनोरंजन व समाजप्रबोधन होणे गरजेचे होते. हे काम वृत्तपत्रे, मासिके व नियतकालिकांनी १९ व्या शतकात केले. याकाळात शिक्षणाचा प्रचार व प्रसार फारसा झालेला नव्हता. लोकांपर्यंत ज्ञान पोहचावे म्हणून राजकीय, सामाजिक, आर्थिक, वाङ्मयीन व धार्मिक या सर्व विषयांवरील माहितीचे स्त्रोत नियतकालिकांमधून द्यायला सुरूवात झाली.

मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा असल्याने मराठी भाषेतच जनसामान्यांपर्यंत आपले विचार पोहचविणे तत्कालीन समाजधुरीणांना गरजेचे वाटत होते. कथा, कविता, नाटक, ललित, समीक्षा वा पाश्चात्य साहित्याचे स्वैर अनुवाद अशा नानाविध वाङ्मयप्रकारांबरोबर मनोरंजनात्मक साहित्य, साहित्यात येणारे नवनवीन सिद्धांत, नवीन घडामोडी याची माहिती देण्याचे कार्य नियतकालिकांनी केले. वास्तविकता व कल्पकता यांच्या आधारावर वाचकांची अभिरूची वृद्धींगत केली. स्त्रियांबरोबर बहुजन समाजाचे तत्कालीन प्रश्न मांडले.

मराठी नियतकालिकांनी गद्य व पद्य या दोन्ही प्रकारच्या साहित्याला प्रकाशित केले. गद्य लेखनाची नवी शैली घडविण्याचे मोठे कार्य केले. लोकशिक्षणाबरोबर समाजात वैचारिक क्रांती घडवून आणली. राष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. मराठी वाङ्मयात नवयुग निर्माण करण्याचे कार्य केले. वाचकांच्या मनात ज्ञानाची लालसा निर्माण झाली. आत्मनिरीक्षणाची सवय निर्माण झाली. मराठी भाषेत नवे विचार, नवनवीन लेखक उदयास आले. व्यवहारोपयोगी ज्ञानही नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या साहित्यातून मिळाले.

ज्ञानप्रसार, समाजप्रबोधन अशा विशिष्ट हेतूने सुरू झालेल्या नियतकालिकांनी वाङ्मयीन कार्याविषयी विशिष्ट हेतू, दृष्टीकोन व उद्देश्यानंतरच्या काळात ठेवला. सुरूवातीला पाश्चात्य वाङ्मयाचा परिचय काही नियतकालिकातून करून देण्यात आला होता. पाश्चात्य संस्कृतीची जाण यावी हे कारण त्यामागे होते.

सुरूवातीला पारतंत्र्यात असणाऱ्या देशाविषयी नियतकालिकांमधून जनजागृती झाली. अनेक सभांमधील भाषणे नियतकालिकांनी छापली. 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' या ग्रंथात अ. ना. देशपांडे म्हणतात की, "राजकीय, सामाजिक आणि धार्मिक सुधारणांना अनुकूल, प्रतिकूल अशी अनेक आंदोलने महाराष्ट्रात झाली. ही आंदोलने यशस्वी करण्याकरिता आवश्यक असलेली लोकजागृती मुख्यतः नियतकालिकांनीच मोठ्या प्रमाणात घडवून आणली. येथे हे कबूल केले पाहिजे की जागृतीच्याबाबतीत प्रभावी वक्त्यांच्या मैदानी भाषणांनी पुष्कळ कार्य करून दाखविले. पण त्या मैदानावर जे लोक ती भाषणे ऐकण्याकरिता जमले नव्हते, त्यांच्यापर्यंत ती भाषणे शेवटी नियतकालिकांनीच नेऊन पोहचविली. १८७८ साली वर्तमानपत्राच्या मुस्कटदाबीचा कायदा पास करण्याची आवश्यकता भासली."

ISSN : 2348-7143
January 2017

वर्तमानपत्रे व नियतकालिके यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या चळवळी सुरू होत्या त्याची माहिती लोकांना होण्यासाठी या माध्यमप्रकारांनी मोठे कार्य केले. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले पण त्याआधी जनजागृतीचा पाया भक्कम करण्याचे काम नियतकालिकांनीच केलेले आपणास दिसते. सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक सुधारणा नियतकालिकांनीच घडविल्या. ज्ञानार्जनाचे व वैचारिकता समृद्ध करण्याचे मोठे कार्य नियतकालिकांनीच केले. १८३२ साली 'दर्पण' निघाले. तिथून ते आजपर्यंतच्या कालावधीत काळानूसार नियतकालिकांची कार्ये ही बदलत गेली. कोणतेही नियतकालिक हे त्या-त्या काळाचे विचारधारणांचे प्रकटीकरण करणारे मुखपत्र असते. त्यातून तो काळ, त्याकाळातील विचार प्रवाह, साहित्यरूप आकार घेत असतात. तसेच तत्कालीन साहित्यव्यवहाराच्या जडणघडणीवर व विचार प्रवाहावर नियतकालिकांचा प्रभाव पडत असतो.

१८५० पासून वाङ्मयीन नियतकालिकांचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. 'मराठी ज्ञानप्रसारक' हे पहिले वाङ्मयीन नियतकालिक होय. दादोबा पांडुरंग, विश्वनाथ नारायण मंडलिक, भास्कर दामोदर पाळंदे, गोविंद नारायण, डॉ. आत्माराम पांडुरंग, महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण भांडारकर, वामन मोडक, बाळ वागळे, महादेव गोविंद शास्त्री, सखाराम अर्जुन, पांडुरंग गोपाळ, विष्णू परशराम शास्त्री, जनार्दन गाडगीळ, नारायण वेलकर इ. मराठी सभेचे सदस्य होते. वाङ्मय, इतिहास, समाजशास्त्र यावर निबंधवाचन, चर्चा करणे, पदार्थ विज्ञान आणि रसायन या शास्त्रावर सप्रयोग व्याख्याने देणे, लोकांच्या गरजा आणि अभिरूची यांना अनुरूप अशा मासिकांचे प्रकाशन करणे ही या सभेची उद्दिष्ट्ये होती. यापैकी लोकांच्या गरजा आणि अभिरूचीसाठी जे मासिक त्यांनी काढले ते म्हणजे 'मराठी ज्ञानप्रसारक' हे वाङ्मयीन नियतकालिक होय.

१८६१ मध्ये 'पुणे पाठशालापत्रक' १८६७ मध्ये 'विविधज्ञानविस्तार' आणि १८७४ मध्ये निबंधमाला प्रकाशित झाले. या नियतकालिकांनी मराठी वाङ्मयीन नियतकालिकांसाठीची एक पार्श्वभूमी सिद्ध केलेली आहे. वाङ्मयीन नियतकालिके ही साहित्यनिर्मिती, साहित्यप्रचार आणि साहित्य अभिरूची घडविण्याच्या बाबतीत मोलाचे कार्य करत होते. या नियतकालिकांचे संपादक हे कल्पक, योजक आणि वाङ्मय अभ्यासक आणि वाङ्मय सेवक होते. सामान्य वाचकाला काय हवे हे जाणून योजनापूर्वक लेखकांची निवड करून त्यांच्याकडून साहित्यलेखन त्यांनी घडवून आणले.

साहित्य व कला यासंबंधी दृष्टी आणि प्रेम असणे ही आजच्या काळाचीही मोठी गरज आहे. त्यादृष्टीने वाङ्मयीन नियतकालिके ही आपले कार्य आजही करतात. त्यातूनच मानवी संस्कृतीचे, साहित्याचे रक्षण व संवर्धन अगत्याने होत राहील.

**संदर्भ -**

१. व. दी. कुलकर्णी-मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, मुंबई विद्यापीठ : मराठी विभाग आणि श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८७,
२. धनंजय कीर, डॉ. स. गं. मालशे, य. दी. फडके (संपा) : महात्मा फुले समग्र वाङ्मय : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, ६ वी आवृत्ती, नोव्हेंबर २००६,
३. अ. ना. देशपांडे-आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग-१, व्हीनस प्रकाशन पुणे, २ री आवृत्ती आक्टोबर १९९२.
४. प्र. न. जोशी- मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रसाद प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९७९, पृ.३५